



दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १४ वा ● बुधवार ३१ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 14 | Date : 31/05/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज २९८ वी जयंती, चौंडीमध्ये लगबग

अ.नगर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज २९८ वी जयंती आहे. यानिमित्ताने त्यांचे जन्मगाव असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी इथे आज (३१ मे) भल्या पहाटेपासूनच लगबग पाहायला मिळत आहेत. या जयंती सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, इंदोरच्या होळकर संस्थानचे श्रीमंत राजे यशवंतराव होळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शासकीय जयंती कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष भाजप आमदार राम शिंदे यांनी पहाटे चौंडीतील महादेव मंदिरात अभिषेक केला आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केलं.अहमदनगरच्या जामखेड तालुक्यातलं चौंडी हे अहिल्यादेवी होळकर यांचं जन्मस्थळ आहे. अहिल्यादेवींच्या २९८व्या जयंतीनिमित्त चौंडी इथे आज शासकीय कार्यक्रम पार पडणार आहे. दुपारी पावणे एक वाजता मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे.

एकीकडे आज अहिल्यादेवी होळकर यांच्या शासकीय जयंतीचा कार्यक्रम साजरा होत असताना काल मध्यरात्रीच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी जयंतीचा कार्यक्रम साजरा केला. या निमित्ताने रोहित पवार आणि राम शिंदे पुन्हा एकदा आमनेसामने आले आहेत. आज शासकीय पद्धतीने जयंती साजरी होत असताना त्याआधीच रोहित पवार यांच्यावतीने होर्डिंग लावून भाविकांचे, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले आहे. प्रत्येक चौकात बॅनर लावलेले आहेत. दरम्यान भाजप आमदार राम शिंदे यांच्या आवाहनानंतरही दोन वेगवेगळ्या जयंती साजऱ्या होणार असल्याने राजकारण तापण्याची शक्यता आहे.तर दुसरीकडे जयंतीच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री येणार आहेत. आम्ही त्यांचं स्वागत करतो. परंतु अहमदनगरच्या नामांतराची घोषणा उद्याच करावी अशी मागणी अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज अक्षय होळकर शिंदे यांनी केली आहे. । पान २ वर

### कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता

## २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार

मुंबई : कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता देण्याचा तसेच येणाऱ्या काळात २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) पुढील ५ वर्षात कापसाची प्रक्रिया क्षमता ३०% वरून ८०% पर्यंत वाढवणे तसेच २५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मिती करणे.

२)वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करण्यात येईल, प्रादेशिक स्तरावर या कार्यालयाला प्रादेशिक वस्त्रोद्योग व रेशीम उपायुक्तालय असे संबोधण्यात येईल.

३) आजारी सहकारी संस्थांच्या पुनर्वसनासाठी, सहकारी सुतगिरणी भाडेतत्वावर देण्यासंदर्भात तसेच सहकारी सुतगिरणीकडील अतिरिक्त जमीन विक्रीसाठी परवानगी देण्याची योजना विभाग तयार करेल.

४)वस्त्रोद्योग क्षेत्राचा विकास आणि वस्त्रोद्योगासाठी कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर आधारित ४ झोननुसार प्रोत्साहन दिले गेले आहे. सहकारी घटकांना जास्तीत जास्त ४५% शासकीय भागभांडवल. प्रकल्पाच्या आकारानुसार आणि



झोननुसार खाजगी घटकांना भांडवली अनुदान -एमएसएमईसाठी जास्तीत जास्त ४५%, मोठ्या उद्योगांसाठी ४०% पर्यंत, विशाल प्रकल्पासाठी ५५% पर्यंत किंवा रु. २५० कोटी यापैकी जे कमी असेल ते आणि महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेसाठी (च-क--ढणऋ) ४०% पर्यंत किंवा रु.२५ कोटी यापैकी जे कमी असेल ते. अति-विशाल प्रकल्पासाठी प्रोत्साहन म्हणून विशेष पॅकेज दिले जाईल.

५) अलीकडच्या काळात जागतिक स्तरावर तांत्रिक वस्त्रोद्योगात वाढ होत असल्याने, सदर धोरण या क्षेत्रावर लक्षणीय भर देणार आहे आणि राज्यात सहा (६) तांत्रिक वस्त्रोद्योग पार्क स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्राची आक्रमक वाढ सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र तांत्रिक वस्त्रोद्योग मिशन घेण्यात येईल. तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्र तंत्रज्ञानातील आदर्श बदलातून जात आहे, ज्यामुळे वेगवान आणि अधिक कार्यक्षम यंत्रणा निर्माण होत आहे. या उदयोन्मुख तंत्रज्ञानातील संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी, दर वर्षी ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली जाईल.

६) राज्यातील वस्त्रोद्योगाच्या वाढीसाठी शाश्वत आणि सुपीक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यमान ३ महामंडळांच्या कार्यात्मक विलीनीकरणाद्वारे एक वैधानिक महामंडळ- महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ (चडढऊ) तयार करण्यात येईल.

७) या धोरणाने पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पादनासाठी हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर दिलेला आहे. वस्त्रोद्योग घटकांना ५० टक्के भांडवली अनुदान देऊन प्रकल्पांना प्रोत्साहन दिले आहे, जसे की इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट्स (ETP) -जास्तीत जास्त ५ कोटी, झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) -जास्तीत जास्त १० कोटी, कॉमन स्टीम जनरेशन प्लांट -जास्तीत जास्त १ कोटी आणि रिसायकलिंग प्रकल्प- जास्तीत जास्त २ कोटी.

८) आर्थिक विकासाचे नवे मॉडेल बनवून त्याला चालना देण्यासाठी, जास्तीत जास्त ४ मेगावॅट क्षमतेपर्यंतच्या सोलर प्रकल्पाच्या स्थापनेसाठी भांडवली अनुदान दिले जाईल आणि वस्त्रोद्योग घटकासाठी नेट मीटरिंगवर १ मेगावॅटची मर्यादा नसेल. या धोरणामुळे सौर ऊर्जेच्या वापरामुळे होणारी अंदाजित बचत धोरण कालावधीत रु.३०००-४००० कोटी इतकी असेल. ९) महाराष्ट्रातील पाच कापड- पैठणी साडी, हिमरू, करवठ काटी, खाना फॅब्रिक आणि घोंगडी हे पारंपरिक कापड म्हणून ओळखले जातात. या धोरणाचे उद्दिष्ट या विणकरांच्या उपजीविकेचे संरक्षण सुनिश्चित करून पारंपारिक कापड विणकरांना इतर रोजगारांकडे वळविण्यापासून परावृत्त करण्यासाठी प्रोत्साहन देणे आहे. प्रतिवर्ष प्रमाणित व नोंदणीकृत पुरुष विणकरांना रु.१०,००० व । पान २ वर

## केंद्र सरकारकडून ४० वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द

### आणखी १५० वैद्यकीय महाविद्यालयांवर टांगती तलवार

नवी दिल्ली : मोदी सरकारनं देशातील ४० वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द केली आहे. यासोबतच केंद्र सरकारनं १५० वैद्यकीय महाविद्यालयं निगराणीखाली ठेवली आहेत, याचाच अर्थ असा की, त्यांच्यावरही लवकरच कारवाई होऊ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान या महाविद्यालयांमध्ये तसेच, तेथील व्यवस्थेत अनेक प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यानं सरकारनं ही पावलं उचलली आहेत. नॅशनल मेडिकल कमिशनच्या यूजी बोर्डानं ही तपासणी केली होती, त्यानंतर या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविद्यालयं विहित नियमांचं पालन करत नाहीत आणि आयोगानं केलेल्या तपासणीत सीसीटीव्ही कॅमेरे, आधार-लिंक्ड बायोमेट्रिक हजेरी प्रक्रिया आणि फॅकल्टी रोलशी संबंधित अनेक त्रुटी आढळल्या आहे. त्यामुळे केंद्र सरकारनं कठोर पावलं उचलत महाविद्यालयांची मान्यता रद्द केली आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, २०१४ पासून वैद्यकीय महाविद्यालयांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. आरोग्य राज्यमंत्री भारती प्रवीण पवार यांनी



फेब्रुवारीमध्ये राज्यसभेत सांगितलं होतं की, २०१४ मध्ये ३८७ वैद्यकीय महाविद्यालये होती, परंतु आता त्यांची संख्या ६९ टक्क्यांनी वाढून ६५४ झाली आहे. याशिवाय, एमबीबीएसच्या जागांमध्ये ९४ टक्के वाढ झाली आहे, जी २०१४ पूर्वीच्या ५१,३४८ जागांवरून आता ९९,७६३ पर्यंत वाढली आहे. झ्रऋ जागांमध्ये १०७ टक्के वाढ झाली आहे, जी २०१४ पूर्वी ३१,१८५ जागांवर होती ती आता ६४,५५९ झाली आहे. कोणत्या महाविद्यालयांची मान्यता रद्द?

केंद्र सरकारनं ज्या ४० वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द केली. ती गुजरात, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू, पंजाब, आंध्र प्रदेश, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यांतील आहेत. तसेच, उर्वरित दीडशे वैद्यकीय महाविद्यालयांची चौकशी अजुनही सुरूच आहे. चौकशीदरम्यान या महाविद्यालयांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्यांची मान्यताही रद्द । पान २ वर

## अजित पवार स्वत:च्या मुलाला निवडून आणू शकत नाहीत: राज ठाकरे

मुंबई : पक्ष म्हटल्यावर चढ-उतार हे येतातच, माझ्यावर टीका करणारे अजित पवार हे स्वत:च्या मुलाला निवडून आणू शकत नाहीत असा टोला मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लगावला आहे. ते अवधूत गुप्ते यांच्या 'खुपते तिथे गुप्ते' या कार्यक्रमात बोलत होते.

खुपते तिथे गुप्ते या कार्यक्रमात राज ठाकरेंनी विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरं दिली. त्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्यासोबतचे संबंध, बारसू रिफायनरी, मनसे पक्षाची वाटचाल, त्यांच्यावर होणारी टीका यासह अनेक मुद्द्यांवर त्यांनी भाष्य



केलं. मिमिक्री करण्यावरुन अजित पवारांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले की, त्यांचा प्रॉब्लेम असा आहे की ते राष्ट्रवादी पक्षाचे नेते आहेत, त्यामुळे ते काही इतर आमदार निवडून आणू शकत नाहीत. मी माझा स्वत:चा पक्ष काढला होता, त्यामधून १३ आमदार निवडून आणले. पक्ष म्हटला की चढउतार हे येतातच. पण अजित पवार म्हणतात आता माझ्याकडे एकच आमदार आहे. अजित पवार स्वत:च्या मुलाला निवडून आणू शकले नाहीत.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संबंधावर राज ठाकरे यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, खूप छान दिवस होते ते, माहित नाही मला कुणी विष कालवलं ते, किंवा कुणी नजर लावली ती.

गेल्या चार वर्षात शिवसेनेच्या दोन मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. या दोघांपैकी कोण शपथ घेताना बाळासाहेबांचं । पान २ वर

## कुस्तीगीरांची सरकारला पाच दिवसांची मुदत; किसान संघटनेच्या मध्यस्थीनंतर पदकांच्या 'विसर्जना'चा निर्णय माग

नवी दिल्ली : भारतीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या अटकेची मागणी करणाऱ्या कुस्तीगीरांनी मंगळवारी पदके गंगा नदीमध्ये विसर्जित करण्याचा निर्णय भारतीय किसान संघटनेने समजूत घातल्यानंतर अखेरच्या क्षणी मागे घेतला. त्याचवेळी कुस्तीगिरांनी ब्रिजभूषण यांच्यावरील कारवाईबाबत निर्णय घेण्यासाठी सरकारला आणखी पाच दिवसांची मुदत दिली आहे.ब्रिजभूषण यांना अटक करण्यासाठी भारतीय कुस्तीगीर एका महिन्याहून अधिक काळ जंतरमंतरवर आंदोलन करीत होते. रविवारी निदर्शकांची धरपकड करत दिल्ली पोलिसांनी त्यांना जंतरमंतरवरून हटविले. सात तास चौकशी केल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले असले तरी काही आघाडीच्या कुस्तीगिरांसह अनेकांवर गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. त्यानंतर आता कुस्तीगिरांनी मंगळवारी सकाळी आपली पदके गंगेमध्ये विसर्जित करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार विनेश फोगट, साक्षी मलिक, बजरंग पुनिया हे कुस्तीगीर संध्याकाळी पदकांसह हरिद्वारच्या गंगा काठावर पोहोचले. त्यांना पाठिंबा देण्यासाठी शेकडो पाठिराखेही हरिद्वारला पोहोचले होते. कुस्तीगीर तासभराहून अधिक काळ पदके हातात धरून बसले होते. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. त्यामुळे वातावरण भावनात्मक झाले होते. या वेळी भारतीय किसान संघटनेचे अध्यक्ष नरेश टिकैत यांनी मध्यस्थीकरून कुस्तीगीरांना पदक विसर्जित करण्यापासून रोखले. टिकैत यांनी कुस्तीगीरांची समजूत



काढली आणि त्यांच्याकडून पदके आपल्याकडे घेतली. त्यानंतर सरकारला ब्रिजभूषण यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाच दिवसांची मुदत देत असल्याचे कुस्तीगिरांनी जाहीर केले.

## तंबाखूमुक्त सोलापूरसाठी लोकसहभाग वाढवावा

### मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी

सोलापूर/प्रतिनिधी : तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनामुळे युवा पिढीला कर्करोगाचा विळखा बसत असून मौखिक कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. कमावता युवक हा व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे कुटुंब व्यवस्था तसेच सामाजिक व्यवस्था कोलमडली आहे. तंबाखूमुक्त सोलापूर करण्यासाठी लोकसहभाग वाढवून तंबाखू विरोधी चळवळ अधिक व्यापक करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू डॉ. गौतम कांबळे होते. याप्रसंगी कुलसचिव योगिनी घारे, समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.



धनंजय पाटील, विद्यापीठाचे एनएसएस विभाग प्रमुख राजेंद्र वडजे, नशाबंदी मंडळाचे रुस्तुम कंपनी उपस्थित होते. सोलापूर जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संभाजीनगर, पोलीस आयुक्तालय, सारथी फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी व्यसनाधीनता आणि सामाजिक व्यवस्था यावर मार्गदर्शन केले. युवा वर्गाला कर्करोगापासून वाचवण्यासाठी प्रभावी समुपदेशन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अतिथींचा सत्कार विभागीय अधिकारी रंगनाथ जोशी यांनी केला. प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी, सूत्रसंचालन प्राध्यापक श्रुती देवळे यांनी तर आभार प्रदर्शन नशामंडळ सोलापूरचे संघटक रुस्तुम कंपनी यांनी केले.

## किनारी रस्ता प्रकल्प मुंबईकरांसाठी दिलासा : मुख्यमंत्री

मुंबई : मुंबई किनारी रस्ते प्रकल्पातील बोगदे खणनाचा टप्पा मावळा-टीबीएम यंत्राने पूर्ण केला आहे. या प्रकल्पामुळे मुंबईकरांचा प्रवास आरोग्यदायी, आरामदायी आणि वाहतूक कोंडीमुक्त होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला. या प्रकल्पामुळे मुंबईच्या पायाभूत सुविधांमध्ये एक महत्त्वपूर्ण अशी भर पडल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील स्वराज्यभूमी-गिरगाव चौपाटी ते प्रियदर्शनी पार्क दरम्यानचा बोगदा खणण्याचा अखेरचा टप्पा- ब्रेक थ्रू मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते कळ दाबून करण्यात आला. याप्रसंगी



मुंबई महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, एल ण्ड टी कंपनी तसेच या प्रकल्पातील सल्लागार कंपन्यांचे अभियंते, अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. प्रियदर्शनी पार्क येथे टीबीएम यंत्राने खोदाईचा हा अखेरचा टप्पा पूर्ण करून बोगदा पूर्ण करताच, या ठिकाणी काम करणाऱ्या अभियंते, अधिकारी, कर्मचारी-कामगारांनी एकच जल्लोष केला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस या दोहोंनीही मुंबई महापालिका आणि प्रकल्प अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्या कंपन्या, सल्लागार तसेच अभियंते, कर्मचारी-कामगारांचे अभिनंदन केले. हे काम आव्हानात्मक होते. ते पूर्ण झाल्याने आपण सर्व एका महत्त्वपूर्ण क्षणाचे साक्षीदार ठरल्याचे कौतुकोद्गारही काढले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मुंबईसाठी हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. देशातील अशा प्रकारचा पहिलाच बोगदा आपण पूर्ण केला आहे. हा प्रकल्प । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



### * सुविचार *

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

## शेतकऱ्यांच्या खात्यात ६ हजार रुपये आणि १ रुपयांत पीक विमा, मंत्रिमंडळाचा निर्णय..

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेली घोषणा पूर्ण करण्याच्या दिशेनं एक पाऊल पुढे टाकलं आहे. पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं नमो शेतकरी सन्मान योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्प जाहीर करताना याबाबत घोषणा केली होती. आज मंत्रिमंडळाने याला मान्यताही दिली आहे. नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना एका वर्षात ६ हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना पीएम किसानप्रमाणे आता ६ हजार रुपये मिळतील. एक रुपयात पीक विमा काढला जाणारराज्यातील शेतकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा देण्याची घोषणा केली होती. शेतकऱ्यांच्या वतीनं पीक विम्याचा हप्ता राज्य सरकार भरणार आहे. या दोन्ही योजनांवर शेतकऱ्यांच्या काय प्रतिक्रिया येते ते पाहावं लागणार आहे. काही शेतकऱ्यांनी या योजनेचं स्वागत करण्यात आलं आहे. नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेचा फायदा राज्यातील एक कोटी शेतकऱ्यांना होणार असून त्यांच्या खात्यावर अतिरिक्त सहा हजार रुपये जमा होणार आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये मिळणार असून शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजनेचाही लाभ घेता येणार आहे, असं फडणवीसांनी सांगितलं. शेतकऱ्यांसाठी ६ हजारांच्या निधीत आणखी ६ हजारांची भर टाकण्याचा निर्णय झालाय. त्यामुळे आता शेतकऱ्यांना वर्षाकाठी १२ हजार रुपये मिळणार आहेत. याचा फायदा १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून ६ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळ बैठकीत कोणकोणते निर्णय?मंगळवार ३० मे २०२३ रोजी मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय (संक्षिप्त)-कामगारांची सुरक्षा, आरोग्य, कामाच्या स्थितीबाबत नवीन कामगार नियमांना मान्यता. लाखो कामगारांचे हित जपले. (कामगार विभाग)-केवळ एक रुपयात पीक विमा योजनेचा लाभ देणार. लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा(कृषी विभाग)-नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राज्यात राबविणार. पीएम किसान योजनेची कार्यपद्धती सुधारणार (कृषी विभाग)-डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेस मुदतवाढ. योजना आणखी तीन जिल्ह्यातही राबविणार.(कृषी विभाग)-सिल्लोड तालुक्यात मका संशोधन केंद्र स्थापन करणार. २२.१८ कोटी खर्चास मान्यता(कृषी विभाग )-महिलांना पर्यटन व्यवसायात अधिक वाव देण्यासाठी महिला केंद्रीत पर्यटन धोरण (पर्यटन विभाग)-राज्याला माहिती तंत्रज्ञानात देशात आघाडीवर नेणाऱ्या नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणास मान्यता. ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार ( उद्योग विभाग)-कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता. २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार (वस्त्रोद्योग विभाग)-सहकारी संस्थांचे कामकाज परिणामकारक व्हावे म्हणून क्रियाशील सदस्यांची व्याख्या स्पष्ट. अधिनियमात सुधारणा करणार( सहकार विभाग)-बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकासास मोठे प्रोत्साहन मिळणार. अधिमूल्यात ५० टक्के सवलतीचा निर्णय ( नगरविकास विभाग)-अभियांत्रिकी, औषधनिर्माण महाविद्यालयांत प्राध्यापकांची १०५ पदांची निर्मिती करणार (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)-नांदुरा येथील जिगाव प्रकल्पाला गती देणार. अतिरिक्त १७१० कोटीच्या खर्चास मान्यता(जलसंपदा विभाग )नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना जाहीर-शेतकऱ्यांसाठी ६ हजारांच्या निधीत आणखी ६ हजारांची भर-शेतकऱ्यांना वर्षाकाठी १२ हजार रुपये मिळणार-राज्य सरकारकडून ६ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद

## तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जागृती

मित्रांनो,




जागतिक आरोग्य संघटनेने यावर्षीची थीम दिली आहे ' आम्हाला अन्न हवे, तंबाखू नको.' याचाच अर्थ जगात तंबाखू ज्या प्रमाणात उपलब्ध होत आहे, त्या प्रमाणात अन्न उपलब्ध होत नाही. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ नुसार भारतात भूखबळींची संख्या अत्यंत गंभीर असून १२१ देशाच्या यादीत भारत १०७ व्या स्थानावर आहे. आपले शेजारी राष्ट्र पाकिस्तान,बांगलादेश व श्रीलंका हे आपल्यापेक्षा सुस्थितीत आहेत.अहो महाराष्ट्र तर कुपोषित बालकांच्या संख्येत देशात पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी असताना मात्र तंबाखू सहज उपलब्ध आहे आणि अन्न मात्र उपलब्ध होत नाही. हे खूप लज्जास्पद आहे. म्हणून आपल्याला स्पष्टपणे सांगायला हवे 'आम्हाला अन्न हवे, तंबाखू नको.'

ग्लोबल एडल्ट तंबाखूच्या सर्वेक्षणानुसार भारतात २९.६% पुरुष तर १२.८ टक्के महिला तंबाखूचे सेवन करतात. तर ५.१% बालक तंबाखूचे सेवन करतात.कॅन्सरने होणारे ३३% मृत्यू हे तंबाखू ओढल्याने, चघळल्याने किंवा तंबाखूच्या अप्रत्यक्षपणे संपर्कात आल्याने होतात. भारतात कॅन्सरच्या प्रमाणात फक्त गेल्या एका वर्षात ३०० टक्क्याने वाढ झालेली असून भारत ही जगाची कॅन्सर ची राजधानी होत आहे.हे अत्यंत दुर्दैवी आहे.

महाराष्ट्रात जवळपास दोन कोटी जनता तंबाखूचे सेवन करतात. त्यामध्ये ८०% तंबाखू व सुपारीचे एकत्रित सेवन करणारे आहेत. त्यातील अनुमानित ७० % जनता ही काळाच्या अगोदरच कर्करोगासारख्या भयानक आजाराच्या विळख्यात पडून मृत्युमुखी पडण्याची शक्यता आहे.

त्यामुळे मी तुम्हा सर्वांना आवाहन करते / करतो की तुम्ही तंबाखूचे सेवन करू नका. तंबाखू पासून मुक्त होण्यासाठी तसेच व्यसनमुक्तीचे कार्य करण्यासाठी तुम्ही मला कॉन्टॅक्ट करू शकता माझा मोबाईल नंबर आहे ९५९५१७१८६६

तंबाखू मतलब खल्लास ! आम्हाला अन्न, हवे तंबाखू नको. व्यसनमुक्त महाराष्ट्र! सक्षम महाराष्ट्र!

**मारुती बनसोडे, जिल्हा संघटक ,**
**उस्मानाबाद , नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य.**

## स्वस्त दरात मिळेल रेती, घरकुलांना मिळेल गती!

नागरिकांना स्वस्त दरानं वाळू (रेती) मिळावी आणि अवैध वाळू उपशाला आळा बसावा, या उद्देशानं महाराष्ट्र सरकारनं नवीन वाळू धोरण जाहीर केलं आहे.

१ मे पासून ७,००० रुपयांना मिळणारी ट्रॅक्टरभर वाळू महाराष्ट्र राज्यात केवळ ६०० रुपयांना मिळणार आहे. नवीन धोरणानुसार, सर्वसामान्य नागरिकांना ६०० रुपये प्रति ब्रास किंवा १३३ रुपये प्रति मेट्रिक टन इतक्या दरानं वाळू मिळणार आहे. वाळू वाहतुकीचा खर्च मात्र नागरिकांना करावा लागणार आहे. एखाद्या व्यक्तीला बांधकामासाठी वाळू हवी असल्यास वाळूची मागणी ऑनलाईन नोंदवता येणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना तसंच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी संबंधित अधिकाऱ्यानं सादर केलेली यादी तहसीलदार तपासून पाहतील आणि तहसीलदारांच्या लेखी परवानगीनंतर लाभार्थ्यास वाळू डेपोतून विनामूल्य वाळू उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यास करावा लागणार आहे. महाराष्ट्र शासन प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी हे धोरण राबवणार आहे.

'अशी' होणार वाळूची विक्री

महाराष्ट्र शासनाच्या आधीच्या वाळू धोरणानुसार, राज्यात वाळू घाटाचे लिलाव होत असत. पण, हे लिलाव वेळेवर होत नसल्यानं राज्यात वाळूचा तुटवडा निर्माण व्हायचा. दुसरीकडे बांधकामं मात्र थांबलेली नसायची. यामुळे राज्यात वाळूची मागणी जास्त आणि पुरवठा कमी, अशी स्थिती निर्माण व्हायची. परिणामी नागरिकांना जास्त दरानं वाळू खरेदी करावी लागायची. सर्वसामान्य माणसाला ७ ते ८ हजार रुपये प्रति ब्रास या दरानं वाळू खरेदी करावी लागायची. एकीकडे वाळूचा तुटवडा आणि दुसरीकडे वाळूला मिळणारा प्रचंड दर, यामुळे राज्यात अवैध वाळू उपशाची प्रकरणं घडायची. अवैध वाळू उपसा रोखणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्नही व्हायचा. आता मात्र नवीन वाळू धोरणानुसार, वाळू घाटाचे लिलाव बंद होणार आहेत.

नवीन धोरणानुसार, वाळूच्या उत्खननासाठी राज्य शासनाकडून आधी नदीपात्रातील वाळूचे गट निश्चित केले जातील. या वाळू गटातून वाळूचं उत्खनन केलं जाईल. मग ही उत्खनन केलेली वाळू शासनाच्याच तालुका स्तरावरील वाळू डेपोमध्ये साठवली जाईल आणि तिथूनच तिची विक्री करण्यात येईल. नदीपात्रातील वाळूचा गट निश्चित केल्यानंतर त्यातून वाळूचं उत्खनन आणि वाहतूक यासाठी संबंधित गावाच्या ग्रामसभेची शिफारस अनिवार्य राहिल. वाळूचं उत्खनन, उत्खनन केलेल्या वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, वाळू डेपोची निर्मिती आणि व्यवस्थापन यासाठी राज्य शासनाकडून निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल.

वाळू मागणीची प्रक्रिया

ज्या ग्राहकांना वाळू हवीय, त्यांना महाखनिज (Mahakhanij) या पोर्टलवर वाळू खरेदीच्या मागणीची नोंद



करणं आवश्यक राहिल. ज्यांना हे शक्य नाही, त्यांना सेतू केंद्रामार्फत ही मागणी नोंद करावी लागेल. यासाठी लागणारं शुल्क जिल्हाधिकारी ठरवतील. याशिवाय मोबाईल ॲपच्या माध्यमातूनही वाळूची मागणी नोंदवता येणार आहे. सध्या यावर राज्य सरकारचं काम सुरू आहे. एका कुटुंबास एका वेळी जास्तीत जास्त ५० मेट्रिक टन वाळू मिळेल. अधिक वाळू हवी असल्यास वाळू मिळाल्याच्या दिनांकापासून १ महिन्यानंतर वाळूची मागणी करता येईल.वाळूची मागणी नोंदवल्यानंतर १५ दिवसांच्या आत वाळू डेपोमधून वाळू घेऊन जाणे ग्राहकास बंधनकारक असेल. वाळू वाहतुकीचा खर्च ग्राहकास करावा लागेल.

वाळू डेपोतून वाळू विक्रीसाठी ग्राहकाचा आधार क्रमांक अनिवार्य राहिल.

वाहतुकीचा खर्च

शासनाच्या डेपोतून प्रति ब्रास ६०० रुपये दरानं वाळू मिळणार असली तरी या वाळूवर जीएसटी लागणार का आणि गौण खनिज कर आकारला जाणार का, हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे. याशिवाय, ट्रॅक्टरभर वाळूच्या एका ट्रिपसाठी जाऊन-येऊन १० किलोमीटर अंतरासाठी जवळपास १ हजार रुपये वाहतूक खर्च आकारला जातो. किती अंतरावर वाळू वाहतूक करायची त्यानुसार हा दर कमी-जास्त होत असेल.

वाळू उत्खननासाठीचे नियम

अवैध वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाच्या नवीन धोरणात काही नियम सांगण्यात आले आहेत. त्यात, १० जून ते ३० सप्टेंबर हा पावसाळ्याचा कालावधी असेल आणि या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. वाळूचे उत्खनन सकाळी ६ ते संध्याकाळी ६ या कालावधीतच करता येईल.नदीपात्रात जास्तीस्त जास्त ३ मीटर इतक्या खोलीपर्यंत निविदाधारक किंवा ठेकेदारास वाळूचे उत्खनन करता येईल.रेल्वे किंवा रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूनं ६०० मीटर अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

शासनाचे धोरण चांगले आहे. यामुळे नागरिकांना कमी दरात वाळू मिळणार आहे. याआधी किती दरानं वाळू विकावी यावर काही नियंत्रण नव्हतं. वाळू घाटातून वाळू काढली की ठेकेदार त्याला हव्या त्या किंमतीला ती वाळू विकायचा. आता मात्र वाळू गटातून वाळू काढली की ती ठेकेदाराला थेट वाळू डेपोत न्यावी लागेल. त्याला ती दुसरीकडे नेता येणार नाही. यामुळे वाळूवरील नियंत्रण वाढणार आहे. याआधी वाळू घाटाचा लिलाव झाला की संबंधित परवानाधारक ती वाळू थेट ग्राहकांना विकत असत. अशावेळी वाळू अवाजवी दरानं विकली जायची. यात एकप्रकारची एकाधिकारशाही निर्माण झाली होती. यातूनच वाळू माफिया तयार झाले होते. आता या प्रकाराला आळा बसेल. नवीन धोरणानुसार, वाळू गटाचे टेंडर निघतील. उत्खननाचं टेंडर मिळालेली व्यक्ती त्या गटातून वाळूचं उत्खननं करेल आणि ती वाळू त्या भागातल्या डेपोमध्ये पाठवली जाईल. या डेपोतूनच नागरिकांना ती वाळू घेता येईल. जवळपास ७ हजार रुपये ब्रासनं मिळणारी वाळू ६०० रुपयांची पावती फाडून मिळत असेल तर ते ग्राहकांच्या फायद्याचंच आहे. वाळू गटापासून डेपोपर्यंत वाळू आणण्यावर महसूल विभागाला लक्ष केंद्रित करावं लागेल. तर, वाळू गटापासून वाळू डेपो जवळच असणार आहेत. तो फार काही अंतरावर नसेल. यामुळे वाळू गटापासून वाळू डेपोपर्यंत होणारी वाहतूक आणि तेवढ्या मार्गावर लक्ष ठेवणंही सोपं होणार आहे.

**वाळू वाहतुकीचे नियम**

नवीन वाळू धोरणानुसार, वाळू वाहतुकीसाठी पुढील नियम सांगितले आहेत.

* वाळूगटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक ट्रॅक्टर किंवा ६ टायरच्या टिप्पर या वाहनांनी करणे बंधनकारक राहिल.* वाळूगटापासून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक करणारे ट्रॅक्टर आणि टिप्पर या वाहनांची संख्या आणि त्यांचे क्रमांक याची नोंदणी करावी. या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांनी वाळू वाहतूक केल्याचे आढळल्यास निविदाधारकावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

* वाळूगटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवणं बंधनकारक राहिल.* सदर वाहनानं वाळू डेपो वगळता इतरत्र वाळूची वाहतूक केल्यास ते वाहन जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाईल. वाळू पुरवठ्यासाठी सध्या तरी तालुक्याच्या ठिकाणी डेपो तयार करण्यात येत आहेत. त्या त्या भागातील वाळूची मागणी लक्षात घेऊन डेपोंची निर्मिती केली जाऊ शकते, असाही अंदाज काही अधिकारी बांधत आहेत.

सध्या राज्य सरकार १ वर्ष प्रायोगिक तत्वावर हे धोरण अवलंबणार आहे. अंमलबजावणी सुरू झाल्यानंतरच त्यातल्या त्रुटी लक्षात येतील आणि मग त्यात सुधारणा केल्या जातील.

**रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

पान १ वरुन

## केंद्र सरकारकडून ४० वैद्यकीय

करण्यात येईल, असं केंद्र सरकारच्या वतीनं स्पष्ट करण्यात आलं आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, या ४० महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारच्या कमतरता आढळून आल्या आहेत. ज्यामध्ये कॅमेरा, बायोमेट्रिक हजेरी, प्राध्यापकांची कमतरता यांसारख्या प्रमुख समस्या होत्या. यासोबतच इतर अनेक बाबींवरही ही महाविद्यालयं तपासणीत खरी ठरली नाहीत. मात्र, या महाविद्यालयांना मान्यता रद्द करण्याच्या विरोधात दाद मागण्याचा पर्याय अजूनही आहे. ज्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे ते सर्व ३० दिवसांच्या आत राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे अपील करू शकतात.

ज्या वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता केंद्र सरकारनं रद्द केली आहे, त्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचं काय होणार? हा मुख्य प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. मात्र तरिही महाविद्यालयांना राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे अपील करण्याचा मार्ग केंद्र सरकारनं खुला ठेवला आहे. त्यामुळे ज्या वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द झाली आहे, त्यांना राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं दिलासा दिला, तर मात्र त्या महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर कोणताही परिणाम होणार नाही. पण मात्र, या वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानंही कायम ठेवला, तर महाविद्यालयांच्या अडचणी वाढणार आहेत. तेव्हा मात्र केंद्र सरकारला त्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काहीतरी मार्ग काढावा लागेल.

## अजित पवार स्वत:च्या मुलाला

स्वप्न साकार झालं असं वाटतं असा प्रश्न विचारल्यानंतर राज ठाकरे म्हणाल की, दोघांपैकी कुणीही शपथ घेताना बाळासाहेबांचं स्वप्न साकार झाल्याचं वाटलं नाही. शिवसेनेच्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेणं हे काही बाळासाहेबांचे स्वप्न नव्हतं. महाराष्ट्र बलशाली व्हावा हे बाळासाहेब ठाकरेंचे स्वप्न होतं असं राज ठाकरे म्हणाले.

केरळमध्ये 'केरला स्टोरी' या चित्रपटावर बंदी आणण्यात आली होती. चित्रपटावर बंदी आणणे यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, आपल्याला वाटतं की आपण लोकशाहीमध्ये राहतोय, पण ही वस्तुस्थिती नाही. झेंडा या चित्रपटामध्ये माझे कॅरेक्टर काहीसं निगेटिव्ह दाखवण्यात आलं होतं. पण मी त्याला विरोध केला नाही. पण आता चित्रपटांना विरोध केला जातोय.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ..

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कुणीही राजकारण करु नये. जयंतीचे स्टेज हे जयंतीचे स्टेज राहायला हवे ते राजकीय स स्टेज होऊ नये, असं त्यांनी म्हटलं होत. त्याबाबत बोलताना भाजप आमदार राम शिंदे यांनी आपण चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करताना कोणतेही राजकारण होऊ नये म्हणून निमंत्रण पत्रिकेत सर्वच विरोधी आमदारांचे नाव टाकली आहेत. मात्र काही लोक इथली प्रथा परंपरा बाजूला ठेवून कधी नव्हे तो वेगळा पायंडा पाडत असल्याने यावर विचारविनिमय झाला पाहिजे, असं राम शिंदे यांनी म्हटलं आहे. आमदार रोहित पवार यांनी काल मध्यरात्रीच महादेव मंदिरात जाऊन अभिषेक केला त्यावरुन बोलताना कुणी वेगळा पायंडा पाडून आपलं अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये, असं राम शिंदे म्हणाले

## किनारी रस्ता प्रकल्प मुंबईकरांसाठी

आणि त्यातील बोगदा पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरत आहोत. समुद्राखालून जाणाऱ्या रस्त्यांसाठी विविध सुविधाही अत्याधुनिक असतील. या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी आपण स्थानिक कोळीवाड्यातील भूमिपुत्रांनाही विश्वासात घेतले आहे. समुद्रातील दोन खांबामधील अंतरही त्यादृष्टीने १२० मीटरचे केले आहे. सर्वांना सोबत घेऊन हा प्रकल्प पुढे नेला आहे. पर्यावरणीय अशा सर्व गोष्टींची काळजी घेतली आहे. मुंबईत असे महत्त्वाचे अनेक प्रकल्प सुरु आहेत. त्यांना केंद्राकडून विशेषतः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आवर्जून पाठबळ दिले आहे. मुंबई ही आंतरराष्ट्रीय नगरी आहे. देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे मुंबईची वाहतूक कोंडीतून मुक्तता व्हावी, नागरिकांना दिलासा मिळेल, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या किनारा रस्ता प्रकल्पाला छत्रपती संभाजीराजे यांचे नाव देण्याचे यापूर्वीच जाहीर केल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, एमटीएचएल हा समुद्री सेतूही आता पूर्ण होतो आहे. हा मार्ग पुढे वरळीला जोडण्यात येणार आहे. त्यामुळे पश्चिम महामार्गावरील ताण कमी होणार आहे. मेट्रोचे विविध मार्ग, उड्डाणपूल यांचे काम पूर्ण होण्यामुळे पश्चिम उपनगरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मुंबईच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पातील हा बोगदा खोदाईचा टप्पा पूर्ण होणे एक महत्त्वाचा टप्पा आहे. या क्षणांचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. या प्रकल्पाचे काम मार्गी लागावे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विशेष सहकार्य केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे हे देखील या प्रकल्पाच्या कामावर सातत्याने लक्ष ठेवून होते. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होईल. तो जनतेसाठी खुला होईल, असे प्रयत्न आहेत. यामुळे नागरिकांच्या दैनंदिन वाहतूक सुविधेत एक महत्त्वाची भर पडणार आहे. हे आव्हानात्मक काम पूर्ण केल्याबद्दल या प्रकल्पासाठी झटणाऱ्या सर्वांचेच कौतुक करावे लागेल.

## २५ हजार कोटींची गुंतवणूक

महिला विणकरांना रु.१५,००० इतका उत्सव भत्ता प्रदान करण्यात येईल. पारंपरिक कापड विणकरांसाठी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेच्या रूपात सामाजिक सुरक्षा कवच आणण्याचे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.१०) राज्यातील रेशीम सेवांच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी राज्याने विविध प्रोत्साहने आणि उपाययोजना केल्या आहेत. १०० डिसीज फ्री लेइंग (DFLs) च्या प्रति बॅचमध्ये सरासरी ककून उत्पादन ६० किलो वरून ७० किलोपर्यंत वाढविण्याचे धोरणाचे उद्दिष्ट आहे.११) रेशीम उद्योगाच्या विकासासाठी राज्य रेशीम-समग्र २ ही एकात्मिक योजना राबवणार आहे. याव्यतिरिक्त, ऑटोमॅटिक रीलिंग मशीन युनिट (ARM) आणि मल्टी-एंड रीलिंग मशीन युनिट (MRM) शेड उभारण्यासाठी अनुदान प्रदान केले जाईल.

१२) विपणन कार्यक्रमांना प्रोत्साहन देऊन हे धोरण देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हातमाग उत्पादनांना विशेष ओळख प्रदान करेल.१३) दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी एक मोफत साडी उपलब्ध करून देण्यासाठी विभाग तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वांसह एक योजना तयार करेल.हे धोरण स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरण अनुकूल उपायांच्या वापरावर भर देते. या धोरणामध्ये जिनिंग, स्पिनिंग, पॉवरलूम, हातमाग, प्रक्रिया, विणकाम, होजियरी आणि गारमेंटिंग, रेशीम उद्योग, लोकर, अपारंपरिक आणि सिंथेटिक सूत/फायबर आणि तांत्रिक कापड यासह प्रत्येक उप-क्षेत्राला प्रोत्साहन देऊन संपूर्ण कापड मूल्य शृंखला समाविष्ट आहे.विद्यमान वस्त्रोद्योग पायाभूत सुविधांना बळकट करणे आणि राज्यातील संपूर्ण वस्त्रोद्योग मूल्य शृंखलेत शाश्वतता आणि तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि माजी सैनिकांना अतिरिक्त सहाय्य प्रदान करणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणाचा उद्देश महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग क्षेत्राला लक्षणीय भरारी देणे आणि तरुणांसाठी पुरेसा रोजगार निर्माण करणे हा आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सभासदांनी मतदान रुपी आशीर्वाद द्यावा थकीत उसाची बील देण्याची सोय मी करतो : अभिजीत पाटील

## सहकार शिरोमणी सभासदांचा अभिजीत पाटील यांना वाढता प्रतिसाद

*** विठ्ठलचे माजी संचालक ज्ञानेश्वर बापू गायकवाड व मा.संचालक संतोष दादा गायकवाड यांसह अनेकांचे अभिजीत पाटील यांच्या गटात प्रवेश**

*** गादेगाव विकास सेवा सोसायटी मा.संचालक विक्रम (आबाजी) बागल, ॲड. उदयसिंह बागल यांनी देखील प्रवेश केला.**



पंढरपूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचारानिमित्त चळे येथे अभिजीत पाटील गटाची सभा झाली यामध्ये चळे गावचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर बापू मोरे यांनी अभिजीत पाटील यांच्या गटात जाहीर प्रवेश करत त्यांना आशीर्वाद देत विठ्ठल कारखाना देखील अभिजीत पाटलांशिवाय कोणी चालू शकत नव्हता आणि त्यांनी यशस्वी गाळप करून शेतकऱ्यांना मागील सर्व थकीत देणी देण्याचे काम अभिजीत पाटील यांनी केल्यामुळे आम्ही सर्व पारदर्शक कारभार करणाऱ्या आणि कारखाना चालवणारे माणसाच्या पाठीमागे आमचे आशीर्वाद आणि भक्कम साथ राहील असे यावेळी ज्ञानेश्वर बापू यांनी सांगितले.

साखर कारखान्याची निवडणूक असून विरोधकांकडून प्रचाराचे मुद्दे भरकटण्याचे काम सुरू आहे. साखर कारखानदारी ऊस बिल केलेलं गाळप शेतकऱ्याची थकीत बिल यावर बोलण्या ऐवजी प्रचार दुसरीकडे घेऊन जाण्याचा प्रकार केल्याचा आरोप अभिजीत पाटील यांनी यावेळी केला. चळे येथे झालेल्या सभेमध्ये विविध पदाधिकाऱ्यांनी अभिजीत पाटील गटात प्रवेश केला. चळे गावातील अनेक सभासदांचे सभासदत्व रद्द केले आहे कल्याणराव काळे यांनी गावातील सभासदांची कधीच संपर्क ठेवला नाही उसाची बिल कधीच वेळेवर दिले नाहीत यामुळे सभासद कल्याण काळे यांच्यावर नाराज आहे त्यामुळे

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना माजी संचालक ज्ञानेश्वर बापू गायकवाड, माजी संचालक संतोष गायकवाड, विद्यमान सरपंच ज्ञानेश्वर बापू शिखरे, उपसरपंच अमोल मोरे, माजी उपसरपंच सचिन मोरे, माजी उपसरपंच चरणदास कोळी, सुशील वाघमारे, प्रताप दादा गायकवाड, डॉ.रामदास घाडगे, समाधान लोमटे (पुळूज)यासह अनेकांनी अभिजीत पाटील यांच्या गटात प्रवेश केला आहे.

अभिजीत पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, सत्ताधाऱ्याकडून निवडणूक भरकटवण्याचा कार्यक्रम सुरू आहे. ऊस बिल कधी मिळणार यावर बोलत नाहीत ३१कोटी बिल कसे देणार हे सांगत नाहीत येणारा पुढील गाळप हंगामासाठी पैसे कुठून उपलब्ध करणार हे सांगत नाहीत. कारखान्यासाठी ४२६ कोटी रुपये कर्ज काढला आहे त्याचं काय केलं हे सांगत नाहीत निवडणूक भरकटवण्यापेक्षा मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या असे आव्हान अभिजीत पाटील यांनी कल्याणराव काळे यांना दिला आहे.

# दत्तवाड येथील नागरिक शुद्ध पाण्याच्या प्रतीक्षेत

## शुद्ध व मुबलक पाणी देण्याची प्रशांत कांबळे यांची मागणी

दत्तवाड येथील जुन्या ग्रामपंचायत मध्ये असलेली पेयजल योजना गेल्या दहा ते बारा वर्षापासून बंद स्थितीत आहे. त्याचबरोबर नव्याने मंजूर झालेल्या पेयजल योजनेचे काम रखडले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. तरी रखडलेली पेयजल योजना लवकरात- लवकर सुरू करण्यात यावी व ग्रामस्थांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा अन्यथा मोर्चा, आंदोलन असा मार्ग अवलंबण्यात येईल **– तेजस वराळे (भाजपा तालुका उपाध्यक्ष मागासवर्गीय सेल)**

दत्तवाड (ता. शिरोळ) येथील ग्रामपंचायत मार्फत गावाला एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. तरी दत्तवाड येथील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाण्याचा पुरवठा करण्यात यावा त्याचबरोबर पाणीपट्टी कर कमी करण्यात यावी अशी मागणी प्रशांत कांबळे यांनी केले आहे.

याबाबत त्यांनी एक निवेदन ही तयार केले असून निवेदनात असे म्हटले आहे की, दत्तवाड मधील ग्रामस्थांना वारंवार कोरडी पडणाऱ्या दूधगंगा नदीमुळे भर उन्हात पाणी टंचाईस तोंड द्यावे लागते. उन्हाळा चालू झाल्यापासून दूधगंगा नदीपात्रात पुरेसे पाणी नसल्याकारणाने वेळोवेळी सात ते आठ दिवस ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा खंडित केला जातो. व या काळामध्ये गावातील सार्वजनिक बोरला देखील पाणी नसते. त्यामुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी वण-वण भटकावे लागते व गैरसोयीस तोंड द्यावे लागते.



दत्तवाड ग्रामपंचायत मार्फत वर्षाकाठी एक हजार रुपये पाणी पट्टी कर नागरिकांच्या कडून वसूल केले जाते. परंतु पंचायतीकडून एक दिवसाआड म्हणजे वर्षातून सहा महिने पाणी दिले जाते. या सहा महिन्यांमध्येच नदीत पाणी नाही या कारणाने २० ते २५ दिवस पाणी नसते पाण्याची मोटर जळाली या कारणाने ८ ते १० दिवस पाणी नसते, पाईपलाईन लिकेज झाल्याकारणाने १५ दिवस पाणी नसते, लाईटचे प्रॉब्लेम या कारणाने १५ दिवस पाणी नसते या व इतर कारणाने पाणीपुरवठा बंद असतो. म्हणजेच ग्रामपंचायतीमार्फत फक्त चार महिनेच नागरिकांना पाण्याचा पुरवठा केला जातो व एक हजार रुपये पाणीपट्टी कर घेतला जातो. अनेकदा पाण्यामध्ये टीसीएल सुद्धा घातले जात नाही. त्यामुळे नागरिकांना अशुद्धच पाणी प्यावे लागते.

दत्तवाड गावाची लोकसंख्या मोठी असताना ग्रामपंचायतीमार्फत चार महिनेच पाणीपुरवठा होतो तसेच ग्रामीण रुग्णालयाजवळील सार्वजनिक बोर गेली महिनाभर बंद अवस्थेत असून त्याची दुरुस्ती केली नाही. सार्वजनिक बोरचे पाणी मराठी शाळेच्या मुलांसाठी, ग्रामीण रुग्णालय व मागासवर्गीय समाजातील नागरिकांना वापरण्यासाठी होत असतो. या सर्वांना पाण्यापासून मुद्दाम वंचित ठेवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गावामध्ये पाण्याबाबत एवढी टंचाई निर्माण होत असताना दत्तवाड ग्रामपंचायतची पाणीपुरवठा कमिटी झोपली आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. दत्तवाड मधील अनेक विकास कामांच्याकडे ग्रामपंचायतीचे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचे येथील नागरिकांतून बोलले जात आहे. तरी दत्तवाड ग्रामपंचायत मार्फत आकारण्यात येणाऱ्या पाणीपट्टी कर कमी करण्यात यावे त्याचबरोबर शुद्ध मुबलक पाण्याचा पुरवठा करण्यात यावा या इतर मागण्यांकडे लक्ष देऊन ताबडतोब पूर्तता करण्यात यावी अन्यथा ग्रामपंचायतीवर मोठ्या संख्येने मोर्चा काढण्याचा इशारा प्रशांत कांबळे (जिल्हा सदस्य वंचित आघाडी), विद्याधर कांबळे (तालुका प्रसिद्धीप्रमुख वंचित आघाडी), तेजस वराळे (भाजपा तालुका उपाध्यक्ष मागासवर्गी सेल), रवींद्र कांबळे (दत्तवाड शहर प्रमुख वंचित आघाडी) कुबेर सिदनाळे (शिवसेना नेते) यांनी दिला आहे.

# नळदुर्ग नगर परिषदेमध्ये तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेमध्ये जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिनानिमित्त तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प करण्यात आला.

नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य,सामाजिक न्यायविभाग महाराष्ट्र राज्य ,जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यालय उस्मानाबाद व नगरपरिषद कार्यालय नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिनानिमित्त नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी आज तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प केलेला आहे.याप्रसंगी नशा बंदी महाराष्ट्र राज्य मुंबईचे उस्मानाबाद जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी सदर संकल्प पत्राचे वाचन केले.यावेळी तंबाखू सेवनामुळे देशभरामध्ये कर्करोगाची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. तंबाखू, मावा ,खरा ,धुम्रपान, यांच्या दुष्परिणामाची जाणीव करून दिली .देशभरामध्ये व जगभरामध्ये सर्वत्र तंबाखू सेवन विरोधी दिन साजरा केला जातो.जागतिक आरोग्य संघटनेने अन्न हवे तंबाखू नको ही स्लोगन दिलेली आहे. याचा अर्थ मानवाला निरोगी जीवन जगण्यासाठी तंबाखू ऐवजी अन्नाचीच गरज आहे असा होतो. परंतु तंबाखू सहज उपलब्ध होत आहे.मात्र गरिबांना अन्न मिळत नाही आणि तंबाखूमुळे प्रचंड नुकसान होते. याची माहिती कर्मचाऱ्यांना त्यांनी दिली यावेळी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक दीपक कांबळे ,अजय काकडे, सुरज गायकवाड , रानूबाई सपकाळ, मयुरी जाधव, सतीश आखाडे, वैभव चिंचोले, खंडू नागने , खंडू शिंदे, फुलचंद सुरवसे, तानाजी गायकवाड सह अनेक कर्मचारी उपस्थित होते

# सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत पहारेकरी पदासाठी भरती


सोलापूर/प्रतिनिधीः सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर व माजी सैनिक विश्रामगृह, पंढरपूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पहारेकरी या पदासाठी माजी सैनिक/माजी सैनिक पाल्य व नागरी संवर्गातून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूकांनी आपला अर्ज, ओळखपत्र, आधारकार्ड, मोबाईल नंबर सह दिनांक १२ जून २०२३ पर्यंत आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद दे. तुंगार यांनी केले आहे.




# सैनिक टाकळी येथे भंडारगृहा साठी सात लाख रुपये मंजूर

सैनिक टाकळी/प्रतिनिधी/संजय चव्हाणः शिरोळ जिल्हा कोल्हापूर येते ग्रामपंचायतीस व्यायाम साहित्य ठेवण्यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय कोल्हापूर यांच्याकडून सात लाख रुपये मंजूर झाले .या आधी सुद्धा जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून सात लाख रुपये अनुदान मंजूर झाले आहे .यासाठी भावानीसिंग मालोजीराजे घोरपडे सरकार यांच्या विशेष प्रयत्नातून मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी सुदर्शन भोसले व संतोष गायकवाड यांचे मोलाचे सहकारी मिळाले आहे .भंडारगृह मंजुरी पत्र जिल्हा क्रीडा अधिकारी साखरे साहेब आणि जिल्हा क्रीडा अधिकारी जमादार साहेब यांच्या हस्ते देण्यात आले.

## शब्दकोडे क्र १४



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

# अकिवाट येथे कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर साखर कारखान्याचे शेतकरी हितगुज संवाद उत्साहात संपन्न



अकिवाट/प्रतिनिधी : कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि,हुपरी यांच्यावतीने शिरोळ तालुक्यातील अकिवाट येथे सभासद व शेतकरी वर्गासाठी हितगुज दौरा केन कमिटी चेअरमन डॉ. राहुल आवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी ऊस विषयक प्रश्नांवर शेतकरी वर्ग व सभासदांशी चर्चा करण्यात आली.यावेळी जवाहर साखर कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलती,पुरवण्यात येणारी बी बियाणे,ऊसाची रोपे आदीबाबत चर्चा करण्यात आली.तसेच शेतकऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याची ग्वाही देण्यात आली. मार्गदर्शन करताना डॉ.राहूल आवाडे म्हणाले की हा हितगुज संवाद राजकीय फायद्यासाठी नाही तर कोरोना , महापूर या नैसर्गिक आपत्तीत माझे शेतकरी बांधव अनेक संकटांना सामोरे गेले आहेत.अशी परिस्थिती पुन्हा उदभवू नये यासाठी देवाचरणी प्रार्थना करतो.शेतकरी व कारखान्याचे संबंध दृढ व्हावेत यासाठी कारखाना मार्फत ऊस विकास योजनेअंतर्गत बिनव्याजी उसपुरवठा केला जातो त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.भविष्यात सभासद शेअर रक्कमेवर साखर देता येते का याबाबत सहकार आयुक्तांकडे मागणीकरू असे आश्वासन दिले.

यावेळी संचालक संजयकुमार कोथळी,विजय कुंभोजे, दादासाहेब सांगावे,जिनगोंडा पाटील, उपशेती अधिकारी भास्कर पट्टणकडेसो,युवा नेते सुहासदादा पाटील व्यासपीठावर होते. तर या मेळाव्यास इकबाल बैरगदार, रावसाहेब नाईक, आप्पासाहेब बडबडे, बाळासाहेब नाईक, आण्णासाहेब हसुरे, विशाल आवटी,श्रेणीक चौगुले, आप्पासाहेब म्हैशाळे, आण्णासाहेब पाणदारे, ड.अरुण कल्लूणाव्वर, बाबासाहेब होसकल्ले,कुमार रायनाडे,राजगोंडा पाटील आदी मान्यवरांसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.हितगुज मेळाव्याचे नियोजन अकिवाट विभागाचे शेती कार्यालयाचे स्टॉफ यांनी केले होते.संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पत्रकार रमेशकुमार मिठारे यांनी केले.

# लोकसेवा हक्क आयोगाच्या सेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक : आयुक्त दिलीप शिंदे

पुणे : राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सेवा राज्यातील सामान्य माणसापर्यंत तत्परतेने, सहज व सुलभपणे पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य हक्क अधिनियम २०१५ अंमलात आहे. या कायद्यातील तरतूदींचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यासाठी विविध माध्यमांतून लोकजागृती करावी, असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी केले.राज्य हक्क अधिनियम २०१५ मधील तरतूदी, कार्यपद्धती व अधिसूचित सेवा ऑनलाईन पद्धतीने घेण्याविषयी माहिती देण्यासाठी आयोजित बैठकीत आयुक्त श्री. शिंदे बोलत होते. यावेळी आयोगाच्या उप सचिव अनुराधा खानविलकर, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, पुणे मनपाचे उप आयुक्त सचिन इथापे, श्यामला देसाई, विक्रम महिते आदी उपस्थित होते. या अधिनियमांतर्गत ५११ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्यापैकी ३८७ सेवा ऑनलाईन पद्धतीने दिल्या जात असल्याचे सांगून श्री. शिंदे म्हणाले अधिनियमामध्ये पदनिर्देशित अधिकाऱ्याने पात्र व्यक्तींना कालबद्ध लोकसेवा देणे बंधनकारक असून सेवा देण्यासाठी निश्चित कालमर्यादा आहे. कालमर्यादेत माहिती देण्यास कसूर करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपयांपर्यंत दंड लावण्याची तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद असल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे म्हणाले, आयोग स्थापन झाल्यापासून १३ कोटी ६२ लाख इतके अर्ज प्राप्त झाले असून १२ कोटी ९४ लाख अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

तर पुणे विभागात एप्रिल २०२३ पासून ७ लाख २७ हजार ४७१ अर्ज प्राप्त झाले असून ६ लाख २८ हजार ६५० असे एकूण ८६ टक्के अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आयोगांतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांचा लाभ आपले सरकार पोर्टलद्वारेही घेता येतो. सध्या पुणे शहरामध्ये ५८६ आपले सरकार सेवा केंद्रचालक असल्याचे सांगितले.या



कायद्यान्व्ये जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आठवडी बाजार, भित्तीपत्रके, शिबीरे, जाहिरात आदींच्या माध्यमातून प्रसिद्धी व लोकजागृती होणे आवश्यक आहे, असे श्री. शिंदे म्हणाले. पुणे जिल्ह्याने सेवा देण्यामध्ये चांगले काम केले असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी आयोगाची संरचना, अधिनियमाची उद्दिष्ट्ये, महत्त्वाच्या तरतूदी, आयोगाचे अधिकार, जिल्हाधिकारी यांची जबाबदारी,आपले सरकार पोर्टलमार्फत ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध असलेल्या सेवा, दैनंदिन वापरासाठी देण्यात येणाऱ्या पदनिर्देशित अधिकारी, नाविन्यपूर्ण उपक्रम याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. बैठकीला आयोगाचे अधिकारी- कर्मचारी, नागरिक, सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## निरोगी जीवनासाठी मौखिक आरोग्य जपणे महत्त्वाचे : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### स्वच्छ मुख अभियानाचे सचिन तेंडुलकर सदिच्छादूत

मुंबई : जगविख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी राज्य शासनाच्या 'स्वच्छ मुख अभियाना'चे सदिच्छादूत (ब्रँड म्बेसेडर) म्हणून करार केला असून त्यांच्या आवाहनाला तरुणांसह सर्व स्तरातील नागरिकांमध्ये जनजागृती होवून अभियान अधिक यशस्वी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन करून निरोगी जीवनासाठी मौखिक आरोग्य जपणे महत्त्वाचे असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्यावतीने स्वच्छ मुख अभियानासाठी सदिच्छादूत सामंजस्य करार स्वाक्षरी कार्यक्रम आज येथे झाला, यावेळी ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य मंत्री गिरीश महाजन, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या सचिव अश्विनी जोशी, आयुक्त राजीव निवतकर, वैद्यकीय संचालक डॉ दिलीप म्हैसेकर, उपसंचालक डॉ.अजय चंदनवाले आदींसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मौखिक आजारांचा प्रादूर्भाव वाढत आहे. शाळेतील मुलांमध्येही तंबाखू, गुटखा, खर्रा अशा पदार्थांच्या सेवनामुळे कॅन्सर रोग आढळत आहे. यासाठी जनजागृती महत्त्वाची आहे. प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी आजपर्यंत कधीच तंबाखूजन्य पदार्थांची जाहिरात केली नाही. आरोग्यासाठी तडजोड न करणाऱ्या जगप्रसिद्ध अशा व्यक्तींनी सदिच्छादूत म्हणून शासनाच्या उपक्रमात सहभाग घेतला आहे. यामुळे येणारी पिढी व्यसनाचे दुष्परिणाम ओळखून, समजावून घेवून स्वच्छ मुख ठेवण्यासाठी सावधगिरी बाळगेल, असे त्यांनी सांगितले.

क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर म्हणाले, भारत हा तरुणांचा देश आहे, पण किती तरुण निरोगी जीवन जगतात हे महत्त्वाचे आहे. जीवन जगतांना तंदुरुस्त दिसणे आणि निरोगी असणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. निरोगी जीवन जगणे प्रत्येकाच्या हातात आहे. यासाठी मी जनजागृती करणार आहे. स्वतःचे मुख स्वच्छ ठेवा आरोग्यदायी जीवन जगा, आयुष्याची मॅच जिंकणे स्वतःच्या हातात आहे. राज्य शासनाने स्वच्छ मुख्य अभियान सुरू करून जनजागृतीच्या पहिल्या इनिंगला सुरुवात केली आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त योगदान देण्याचा प्रयत्न करणार आहे, असे श्री. तेंडुलकर यांनी सांगितले.




मंत्री श्री. महाजन म्हणाले की, सचिन तेंडुलकर आणि वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्यामध्ये 'स्वच्छ मुख अभियाना'साठी आज सामंजस्य करार स्वाक्षरी कार्यक्रम झाला. सचिन तेंडुलकर यांनी या अभियानाचे सदिच्छादूत पद स्वीकारल्यामुळे या अभियानाची सर्वदूर व्याप्ती पसरुन चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही मंत्री श्री. महाजन यांनी व्यक्त केला. राज्यात वाढत्या मौखिक आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत शिफारस करण्यात आलेल्या आणि जागतिक आरोग्य संघटनेने नमूद केलेल्या मौखिक आरोग्याबाबत कृती योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने या वर्षापासून 'महाराष्ट्र मौखिक आरोग्य अभियान' म्हणजेच 'स्वच्छ मुख अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्यावतीने हे अभियान जानेवारी २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. कॅलेंडर, कॅम्प आणि कॅम्पेन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजात मौखिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी मोठ्याप्रमाणात अभियान राबवले जाणार असल्याचेही श्री महाजन यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव अश्विनी जोशी यांनी केले. आभार आयुक्त राजीव निवतकर यांनी मानले.

## टाकळीवाडी मध्ये पाणी अभावी खोडवा ऊस पीक दीड एकर पूर्णपणे करपला

टाकळीवाडी/प्रतिनिधी: टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे गट नंबर ५७ या शेतातील खोडवा पीक पूर्णपणे करपलेला आहे. पिकासाठी ३ बोर शेतामध्ये खोदण्यात आले आहेत. परंतु उन्हाळा भरपूर आहे. वळवाचा पाऊस नाही. यामुळे पाण्याची पातळी पूर्णपणे खाली गेलेली आहे.



टाकळीवाडी मध्ये माळरान भरपूर असल्यामुळे ३ ते ४ दिवसाला पिकाला पाण्याची आवश्यकता असते. यावर्षी वळीव पावसाने दांडी मारल्यामुळे टाकळीवाडी गावावर मोठे संकट आले आहे.शेतकऱ्याची अवस्था आता गावामध्ये बिकट झालेली आहे. पिकाकडे पहावेसे वाटत नाही. डोळ्या देखत पिके करपत आहेत. शेतकऱ्यांनी जगायचं कसं आता हा प्रश्न मोठा निर्माण झालेला आहे.

या खोडवा पिकासाठी ३० ते ४० हजार रुपये खर्च आलेला आहे. तरी आता सध्या ऊस पिक करपून गेलेले आहे. उत्पन्न निघणार नाही. शेतकरी आपला उदरनिर्वाह कसा चालवायचा हा प्रश्न आता गंभीर बनत चाललेला आहे.दिवसेंदिवस शेतकऱ्याची अवस्था बिकट होत चालली आहे. कृषी प्रधान देशात ही अवस्था पाहायला मिळत आहे. या शेतकऱ्याने बांधाला झाडे लावण्याचा सुद्धा संदेश दिलेला आहे.

## प्राचार्य उत्तमराव लवटे व चंद्रकांत देशमुख यांच्या सेवापुर्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात

पंढरपूर/प्रतिनिधी : वामनराव माने प्रशाला व कला, शास्त्र कनिष्ठ महाविद्यालय, भैरवनाथवाडी येथे प्राचार्य श्री.उत्तमराव लवटे सर व वरिष्ठ लिपिक श्री. चंद्रकांत देशमुख सर यांच्या सेवापुर्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




संस्थेचे अध्यक्ष ड. श्री. वामनराव माने सर (मा .सभापती पंचायत समिती पंढरपूर )तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. श्री. सुभाषराव माने सर( जि प सदस्य तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य जि प सोलापूर) हे होते. प्रस्तावना श्री.विजयसिंह माने सर यांनी केली तसेच सौ. व श्री. उत्तमराव लवटे सर व सौ. व श्री. चंद्रकांत देशमुख सर यांचा सत्कार आदरणीय अण्णांच्या शुभ हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक प्रा.डॉ.श्री. हनुमंतराव लोंढे सर, डॉ.श्री. प्रतापसिंह माने, श्री.विजयसिंह माने सर,श्री.विक्रमसिंह माने सर, प्राचार्य श्री उत्तमराव कोकरे सर, सौ. संगीता माने मॅडम, डॉ.सौ .पल्लवीताई माने मॅडम तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंद उपस्थित होते प्रा. श्री .सुभाषराव माने सर व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री वामनराव माने सर यांनी आपल्या भाषणामध्ये श्री लवटे सर व श्री देशमुख सर यांनी केलेल्या कार्याचा गुणगौरव केला व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या . तसेच सत्कारमूर्ती प्राचार्य श्री.उत्तमराव लवटे सर व श्री. चंद्रकांत देशमुख सर यांनी आपल्या भाषणामध्ये संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली सूत्रसंचालन श्री.एस.एम.शिवशरण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. श्री. नरसाळे सर यांनी केले.

## ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल १ जूनपासून रायगड परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार २ जून रोजी सकाळी ८.३० वाजता सोहळ्याचा उद्घाटनाचा कार्यक्रम होणार आहे. यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संदेशाचे प्रक्षेपण केले जाणार आहे.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय संस्कृती मंत्री जी. किशन रेड्डी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री उदय सामंत, रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजी राजे छत्रपती तसेच इतर लोकप्रतिनिधी व मान्यवर मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. मंगळवार, ६ जून रोजी देखील सकाळी ८.३० वाजता रायगड किल्ल्याच्या परिसरात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पाचाड येथे १ ते ६ जून या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गेट वे ऑफ इंडिया येथे 'जाणता राजा' महानाट्याचे आयोजन

याशिवाय, १ जून ते ७ जून या काळात गेट वे ऑफ इंडिया येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन सांस्कृतिक कार्य विभाग व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे. १ जून रोजी 'जाणता राजा' हे महानाट्य, २ जून रोजी राजस्थानी लोककला, ३ व ४ जून रोजी महाराष्ट्राची लोककला तसेच ५ ते ७ जून दरम्यान गोवा व गुजरात या राज्यातील लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या सोबतच १ ते ७ जून या कालावधीत शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्ताने गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या विनामूल्य सन्मानिका श्री. शिवाजी नाट्य मंदिर, दादर, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, दामोदर हॉल, परळ, दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विले पार्ले, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, बोरीवली, गडकरी रंगायतन, ठाणे, सावित्रीबाई फुले नाट्यगृह, डोंबिवली, आचार्य अत्रे नाट्यगृह, कल्याण, विष्णूदास भावे नाट्यगृह, वाशी, महाकवी कालिदास नाट्यमंदिर, मुलुंड, डॉ.काशीनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे, येथे उपलब्ध असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यअसेल.

## सैनिकी मुलां/मुलींच्या वसतिगृहात प्रवेशासाठी ३० जूनपर्यंत अर्जाची मुदत

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सुंदरमनगर, विजापूर रोड, सोलापूर येथील सैनिकी मुला/मुलींच्या वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी दिनांक ३० जून २०२३ पर्यंत सैनिकी मुला/मुलींचे वसतिगृह अधीक्षक/अधिक्षिका यांच्याकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद दे. तुंगार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.पत्रकात म्हटले आहे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखाली सुंदरमनगर, विजापूर रोड, सोलापूर येथे सैनिकी मुला/मुलींचे वसतिगृह चालविण्यात येत आहे. आजी/माजी सैनिकांच्या तसेच विधवांच्या पाल्यांना येथे सवलतीच्या दरात निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध आहे. वसतिगृह ०३ जुलै २०२३ पासून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. तरी ज्या आजी/माजी सैनिकांचे तसेच सैनिक विधवांचे पाल्य सोलापूर येथील शैक्षणिक संस्थेत इयत्ता ८ वी ते पुढील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत आणि जे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छितात, त्यांनी वसतिगृह अधीक्षक/अधिक्षिका यांच्याकडून रुपये ५०/- ची प्रवेश पुस्तिका घेऊन त्यांनी त्यांचे अर्ज दिनांक ३० जून २०२३ पर्यत सैनिकी मुलां/मुलींचे वसतिगृह अधीक्षक/अधिक्षिका यांच्याकडे सादर करावेत.

## शरणप्पा इरसंगप्प सलगरे यांचे निधन

अक्कलकोट/ प्रतिनिधी : प्रगतशील शेतकरी,गरिबाचे आधारस्तंभ व प्रतिष्ठित व्यक्ती



शरणप्पा इरसंगप्प सलगरे वय८१यांचे गौडगांव बु।। येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले.ते माजी सरपंच विरभद्र सलगरे यांचे वडील होते.त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ,बहिण तिन मुले,दोन मुली,नातू, नातवंडे असा मोठा परिवार होत.

## त्या लाच प्रकरणाचे २०० पानी आरोपपत्र जिल्हा सत्र न्यायालयात दाखल

मंगळवेढा/प्रतिनिधी : सांगली -सोलापूर राष्ट्रीय महामार्गात बाधीत झालेल्या पाईपलाईनची मंजूर रक्कम देण्यासाठी सात हजाराची लाच स्विकारल्या प्रकरणातील २०० पानांचे आरोपपत्र ५८ दिवसात तपासीक अंमलदार तथा पो.नि.उमेश महाडीक यांनी पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केले आहे. घटनेची हकीकत अशी, सांगली-सोलापूर राष्ट्रीय महामार्गात बाधीत झालेल्या गट क्रमांक ५२ कमलापूर येथील पाईपलाईनची मंजूर रक्कम १ लाख ४३ हजार ७९४ रुपये शेतकर्याला देण्यासाठी यातील आरोपी तलाठी सुरज रंगनाथ नळे यांनी झीरो कर्मचारी पंकज चव्हाण यांच्या मध्यस्तीने दिनांक २९ मार्च २०३३ च्या रात्री १०.१५ वाजता सात हजाराची लाच स्विकारताना सोलापूरच्या लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले होते. याचा तपास पोलीस निरीक्षक उमेश महाडीक यांनी करुन तब्बल २०० पानांचे आरोपपत्र तयार केले. तसेच प्रथमच ५८ दिवसात न्यायालयात ते सादर केले आहे. आरोपी नळे याने जामीन मिळावा यासाठी पंढरपूर न्यायालयात प्रथम अर्ज ठेवला होता. मात्र शासकीय अधिकार्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न झाल्याने ही गंभीर बाब लक्षात घेवून न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता. तद्नंतर नळे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेवून तेथेही अर्ज दाखल केला होता.

मात्र मुंबई उच्च न्यायालयाने घटनेचे गांभीर्य ओळखून जामीन अर्ज फेटाळला. दरम्यान आरोपी तलाठी नळे व दलालवाला हे दोघेही घटना घडल्यापासून ते आजतागायत कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत.

लाच प्रकरणात आत्तापर्यंत जास्तीत जास्त दिवस कारागृहात बसणारे आरोपी असल्याचे सांगण्यात आले. तपासीक अंमलदार पो.नि.उमेश महाडीक यांनी सखोल चौकशी करुन पुराव्यासह तपास केल्याने या घटनेला एक भक्कमता आली आहे.

## सैनिक टाकळीच्या राशी राजेश पाटीलने मिळवले उज्ज्वल यश

सैनिक टाकळी/संजय चव्हाण राशी राजेश पाटील हीने ऍडमिशन घेण्यासाठी एकदाच कॉलेजमध्ये गेली त्यानंतर गेली ती डायरेक्ट परीक्षा देण्यासाठीच. घरात बसून अभ्यास केला. शिक्षकांनी कधी नोट्स घरी पाठवल्या तर कधी फोनवरून मार्गदर्शन केलं. परीक्षेच्या दिवशी घरच्यांनी केंद्रावर उचलून नेलं. बारावी परीक्षेचा निकाल लागला आणि ६४.५०% गुण मिळवले. राशी दिव्यांग आहे. तिला तिची आई तर कधी तिच्या शाळेचा शिपाई उचलून शाळेत न्यायचे,घरी आणून सोडायचे. कधी कधी तिचा पांगुळ गाडा तिची दिदी तर कधी लहान भाऊ ढकलत न्यायचा. हे असं दहावीपर्यंत शिक्षण गावातच झालं.इयत्ता पाचवी पासून अभ्यासाची आवड होती.



वाचनलेखनाची गोडी पाहून कुरुंदवाड येथील सहकार भूषण एस के पाटील महाविद्यालयाने पुढील शिक्षणाची संधी दिली. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे कॉलेज जीवनाचा आनंद घेता आला नसला तरी चांगल्या चांगल्या विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवावा असं यश तिने मिळवलं आहे. सैनिक टाकळी चे लेखक मनोहर भोसले यांनी तिच्या या यशाबद्दल तिच्या घरी जाऊन शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीस मार्गदर्शन केले.खरोखरच तिचे सैनिक टाकळी मध्ये कौतुक होत आहे .व सैनिकाटाकळीकरांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे .व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत